सुनील नांदगावकर
sunil.nandgaokar@expressindia.com

# स्वातंत्र्यवीर सावरकरांची पुस्तके आता 'ई-बुक'द्वारे विनामूल्य उपलब्ध

आतापर्यंत फक्त स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाकडे उपलब्ध असलेले सर्व साहित्य बुकगंगा या संकेतस्थळामुळे जगभरात पोहोचणार आहे. या संकेतस्थळाद्वारे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे साहित्य ई-बुक माध्यमातून मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहे. 'बुकगंगा डॉट कॉम' या संकेतस्थळाद्वारे पुस्तक विक्री केली जाते तसेच ई बुक्सही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. स्वा. सावरकर यांची पुण्यतिथी नुकतीच झाली. त्या पार्श्वभूमीवर बुकगंगा




संकेतस्थळावर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी तसेच इंग्रजीत लिहिलेली तब्बल ५८ पुस्तके जगभरातील वाचकांना ई- बुक माध्यमातून विनामूल्य वाचायला मिळणार आहेत, अशी माहिती या संकेतस्थळाचे प्रमुख संजय पेठे यांनी 'लोकसत्ता'ला दिली.

पुस्तकविक्रीचे संकेतस्थळ असले तरी जगभरातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार आणि त्यांचे साहित्य पोहोचावे या एकाच उद्देशाने 'बुकगंगा'ने त्यांचे साहित्य विनामूल्य उपलब्ध करून दिले आहे. आतापर्यंत स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारकाकडेच त्यांची पुस्तके उपलब्ध होती. त्यांच्या संकेतस्थळावरही त्याची माहिती आहे. परंतु, जगभरातील विविध स्तरातील मोठ्या प्रमाणावर असलेला वाचकवर्ग बुकगंगा संकेतस्थळावर लॉग ऑन करीत असल्यामुळे स्वा. सावरकरांचे साहित्य याद्वारे उपलब्ध करून देण्याचा विचार आला. स्वा. सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या हिमानी सावरकर , रणजित सावरकर यांनीही ताबडतोब होकार देऊन ई-बुकसाठी स्वा. सावरकरांची पुस्तके उपलब्ध करून दिली. ई-बुकद्वारे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचणे सहजशक्य झाले असून स्वा. सावरकर यांच्या पुस्तकांची मुखपृष्ठे, पुस्तकाचा सारांशही उपलब्ध करून दिल्यामुळे ई-बुक डाऊनलोड करण्यापूर्वी पुस्तकात काय आहे, पुस्तकाची पाने किती आहेत, हे त्वरित समजते. त्यामुळे आपल्या संगणकावर अथवा लॅपटॉपवर उपलब्ध मेमरीनुसार संबंधित ई-बुक डाऊनलोड करायचे की नाही हे वाचकाला ठरविता येते, असेही पेठे यांनी सांगितले. या संकेतस्थळाद्वारे लेखक-प्रकाशकांना वाचकांशी थेट संपर्क करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. जुन्या पुस्तकांची ई- बुक तयार करण्यासाठी पीडीएफ आवश्यक असते. मग अशी पुस्तके नव्याने टाईप करून घ्यावी लागतात. त्यासाठी लेखकांनी पुढाकार घेऊन सहकार्य केले तर जास्तीत जास्त पुस्तके ई-बुकद्वारे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचविता येईल, असे आवाहनही पेठे यांनी केले आहे. ■